नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १/०३/२०२५ (शनिवार) दुपार

## मोटर सायकल चोरी करणारे ४ आरोपी अटक. एकुण ६ गुन्हे उघड, २० मोटरसायकल किंमती ४,८५,००० रुपयेचा मुददेमाल जप्त काटोल पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन काटोल** :– पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत माहे जानेवारी व फेब्रुवारी मध्ये मोटार सायकल चोरीचे गुन्हे वाढल्याने, सदर गुन्हे उघडीस आणणे कामी मा. श्री. हर्ष ए. पोद्‌दार , पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री. रमेश धुमाळ ,अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री बापु रोहोम ,उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. निशांत मेश्राम, ठाणेदार काटोल पोलीस स्टेशन यांनी पोलीस स्टेशन काटोल येथील गुन्हे शोध पथकाचे सपोनि शिवाजी नागवे, पोलीस हवालदार कैलास उईके ब.नंबर १९८०, पोलीस नाईक भुषण मदनकर ब.नंबर ३९८ व पोलीस कॉन्स्टेबल गौरव बखाल ब.नंबर २३०७ यांचे पथक तयार केले.

सदर गुन्हे शोध पथकास गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने आरोपी क्र १) राम उर्फ शुभम सुभाष जाधव (२) हर्षल राजेंद्र जिचकार दोघेही रा.बेनोडा, ता. वरुड जि. अमरावती यांचा सदर गुन्हयात सहभाग असल्या बाबत माहीती प्राप्त झाली. नमुद आरोपी क्र १ आणि २ यांना पोलीसांनी ताब्यात घेवुन त्यांच्याकडे सखोल व बारकाईने तपास केला असता त्यांचे साथीदार नामे आरोपी क्र. (३) सौरभ रुपेश गायकवाड व (४) दर्शन रत्नाकर आवारे, दोघे रा. बेनोडा ता. वरुड यांच्यासह आरोपीतांनी काटोल पोलीस स्टेशनच्या हद्‌दीतुन अप क्र ९१५/२०२४, ९७१/२०२४, २५/२०२५, ११६/२५,१३८/२०२५ व १४१/२०२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिते प्रमाणे गुन्हयातील एकुण ६ मोटर सायकल चोरी केल्याची माहिती प्राप्त झाली. **नमुद चारही आरोपीतांना अटक करून** आरोपीतांकडुन एकुण २० मोटर सायकल जप्त करण्यात आल्या आहे. सदर जप्त मोटर सायकल पैकी ६ मोटार सायकल पोलीस ठाणे काटोल येथील गुन्हयातील असुन उर्वरीत १४ मोटार सायकल या आरोपीतांनी

अमरावती शहर व अमरावती ग्रामीण भागातुन चोरी केल्या आहे अशी माहीती प्राप्त झाली आहे. **आरोपीतांकंडुन अशा एकुण हिरो व होंडा कपंणीच्या स्पेंडर, स्पेंडर प्लस,पॅशन प्रो, बजाज कंपणीच्या प्लॅटिना व डिस्कव्हर अशा २० मोटर सायकल किंमती ४,८५,००० रुपये चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

**पोलीस स्टेशन काटोल नागपुर ग्रामीण जिल्हा येथील उघड गुन्हे**

१. अप क्र ९१५/२०२४, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता

२. अप क्र ९७१/२०२४, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता

३. अप क्र २५/२०२५, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता

४. अप क्र ११६/२५, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता

५. अप क्र १३८/२०२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता

६. अप क्र १४१/२०२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता



नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर